परिपत्रक

जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा./२०१६/4002
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे- ४११ ००१.
दिनांक : ११/६/२०१६

प्रति,

संस्थाचालक,
सर्व शासनमान्य संगणक टंकलेखन व लघुलेखन संस्था,
महाराष्ट्र राज्य.

विषय :- संगणक टायपिंग अभ्यासक्रम सत्र जून २०१६ ते नोव्हेंबर २०१६ प्रवेशाबाबत.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, संगणक टायपिंग अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी राज्यातील ज्या शासनमान्य संगणक टंकलेखन व लघुलेखन संस्थांना संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्या मार्फत मान्यता मिळालेली आहे आणि महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून ई-प्रमाणपत्र (संगणक टायपिंग सांकेतांक क्रमांक) प्राप्त झाले आहे. अशा संस्थांमधून प्रविष्ठ झालेल्या उमेदवारांची मराठी, हिंदी , इंग्रजी ३० श.प्र.मि.या विषयांची ऑनलाईन परीक्षा एप्रिल २०१६ मध्ये घेण्यात आली. एप्रिल २०१६ च्या ३०. श.प्र.मि. परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मराठी, हिंदी, इंग्रजी ४० श.प्र.मि.ला प्रवेश देणेस सुरुवात करावी. प्रवेशाचा कालावधी दिनांक १ जून २०१६ ते ३० जून २०१६ असा राहील.

तसेच १६ जून २०१६ ते ३० जून २०१६ या कालावधीत परिषदेच्या संकेतस्थळावर या विद्यार्थ्यांची ऑनलाईन माहिती भरावी. संस्थांनी प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती संस्थेच्या जनरल रजिस्टरप्रमाणे नोंदविणे आवश्यक आहे. संगणक अभ्यासक्रमासाठी स्वतंत्र जनरल रजिस्टर ठेवण्यात यावे.

जी.सी.सी. - टी.बी.सी. ४० श. प्र.मि. करिता जून २०१६ ते नोव्हेंबर २०१६ या सत्रासाठी प्रवेशित झालेल्या सर्व विद्यार्थ्यांची माहिती परिषदेच्या संकेत स्थळावर ऑनलाईन भरण्याकरिता लिंक दिनांक १६/०६/२०१६ पासून उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यांनतर विद्यार्थ्यांची परीक्षांची आवेदनपत्रे भरण्यासाठी स्वतंत्र कालावधी दिला जाईल. संकेत स्थळावर माहिती भरलेल्या विद्यार्थ्यांनाच फक्त परीक्षेस बसता येईल याची नोंद घ्यावी.

(आर. व्ही. गोंधणे) 11/6/16.

आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-०१

प्रत :-

१. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
२. शिक्षणाधिकारी (माध्य) जि.प.(सर्व)
३. शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई (उत्तर/दक्षिण/पश्चिम)

F:/ GCC-TBC/Addmission/Madhura